| | M.A., B.Ed (PGT) | English & Social Science | 1 | |
| | B.A., B.Ed (TGT) | English & Social Science | 1 | |
| | B.A., B.Ed (TGT) | Marathi | 1 | |
| | Dance Teacher | Related Qualification | 2 | |
| | Music Teacher | Related Qualification | 1 | |
| | Physical Educator | B.P.,Ed. / M.P.,Ed. | 2 | |
| | Counsellor | B.A. / M.A. Psychology | 1 | |
| | Special Educator | Related Qualification | 1 | |
| | BCS, BCA, MCS, MCM | Computer Teacher | 1 | |

Fluency in spoken & written English with appropriate subject qualification is mandatory. Candidates with experience will be preferred. Application with hand written biodata should reach to the above address. Within 10 days from the date of Publication of this advertisement.

**Baburao Javalekar**
**Hon. Secretary**
**Camp Education Society Pune-1.**

**Walchand Sancheti**
**Chairman**
**Camp Education Society Pune-1.**

# QUICK NEWS

## घाटकोपरमध्ये रक्तदान शिबिर

**मुंबई** महाराष्ट्र दिनानिमित्त आज सकाळी घाटकोपर पूर्वेकडील शिवराज क्रीडा मंडळाच्या वतीने एका भव्य रक्तदान शिबीरचे आयोजन करण्यात आले होते. पंतनगर येथील समाज मंदीर हॉल येथे हे शिबिर आयोजित केले होते. यावेळी माजी नगरसेवक प्रदीप सावंत, सुरेश गोलतकर यांच्यासह यावेळी माजी उपविभागप्रमुख प्रकाश वाणी, सचिन भांगे, मंडळाचे कैलास गोसावी, दिलीप पुरव, समाजविकास अधिकारी अश्विनी, अशोक देवरे पाटील, डॉ. जाधव, डॉ. खरात आदी उपस्थित होते.

## रिपाइंची आज बैठक

**मुंबई** रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार, २ मे रोजी सायंकाळी ६ वाजता भिम छाया सांस्कृतिक केंद्र सांताक्रुज येथे बैठक बोलवण्यात आली आहे. मुंबई प्रदेश रिपब्लिकन पक्षाच्या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची व मुंबईतील रिपब्लिकन पक्षाच्या सर्व प्रमुख नेत्यांची महत्त्वाची बैठक बोलावली आहे.

### पालिका आयुक्तांचा दावा फोल

# नालेसफाई संथगतीनेच सुरू

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** मुंबईत दरवर्षी कमी वेळात जास्त पाऊस पडतो. पावसाचे पाणी साचून मुंबई ठप्प होते. यासाठी पालिकेकडून कंत्राटदारांच्या मदतीने नालेसफाई केली जाते. पालिका आयुक्तांनी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ५० टक्के नालेसफाई होईल, असा दावा केला होता. मात्र १ मे रोजी केवळ २७ टक्केच नालेसफाई झाल्याचे समोर आले आहे. दोन शिफ्टमध्ये काम, दुप्पट मशिनरी लावण्याच्या आदेशानंतरही काम संथ गतीने सुरू असल्याने पालिका आयुक्तांचा दावा फोल ठरल्या पाहायला मिळत आहे.

मुंबईत 3 वेळा नालेसफाई केली जाते. पावसाळ्यापूर्वी ७५ टक्के, पावसाळा सुरू झाल्यावर १५ टक्के तर पावसाळा संपल्यावर १० टक्के अशी नालेसफाई केली जात आहे. मुंबईत २ लाख ८९ हजार ६९९ मीटर लांबीचे ३०२ नाले आहेत. यामधून ९ लाख ७ हजार १६० मॅट्रिक टन गाळ काढायचा असून त्यापैकी १ मे पर्यंत ३ लाख ८० हजार २८६ मॅट्रिक टन गाळ काढण्यात आला आहे. १ मे पर्यंत शहर विभागात १५ टक्के, पूर्व उपनगरात ३८ टक्के तर पश्चिम उपनगरात ३० टक्के, मिठी नदी ७९ टक्के तर छोटे नाले ३० टक्के साफ झाले आहेत. आजपर्यंत एकूण २७.६६ टक्के नालेसफाई करण्यात आली आहे तर छोटे नाले धरून २८.२५ टक्के नालेसफाई झाली असल्याचा दावा पालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे.



### उशिरा कामास सुरूवात

मुंबई महापालिकेचा कार्यकाळ ७ मार्च २०२२ रोजी संपुष्टात आल्याने नालेसफाईच्या कामाचे प्रस्ताव मंजूर झाले नव्हते. हे प्रस्ताव प्रशासक असलेल्या महापालिका आयुक्त इकबाल सिंग चहल यांनी उशिरा मंजूर केले. ५ एप्रिल रोजी वर्क ऑर्डर देण्यात आली. त्यामुळे यंदा नालेसफाई १५ दिवस उशिरा सुरुवात झाली.

### दावे वरवरचे

नालेसफाई झाल्याचा दावा केला जात असला तरी पालिकेचे हे दावे वरवरचे आहेत. बहुतेक नाले गाळाने अजुनही तुंबलेले आहेत. पाऊस तोंडावर आला असताना नाले सफाईचा गाळ कसा उचलणार, तो गाळ वेळेवर उचलला जाईल का असा प्रश्न माजी विरोधीपक्ष नेते रवी राजा यांनी केला आहे. नालेसफाईच्या कामाचा पर्दाफाश करणार असल्याचा इशारा भाजपाकडून देण्यात आला आहे.

### दोन शिफ्टमध्ये काम

- आतापर्यंत सुमारे २७ टक्के नालेसफाई पूर्ण झाली असून मे च्या पहिल्या आठवड्यापर्यंत ५० टक्के तर ३३१ मे पूर्वी ७५ टक्के नालेसफाई पूर्ण करण्याचे आदेश पालिका आयुक्तांनी अधिकारी आणि कंत्राटदारांना दिले आहेत.
- नालेसफाई लवकर पूर्ण करता यावी, यासाठी दोन शिफ्टमध्ये काम व मशिनरी दुप्पट करण्याचे आदेशही आयुक्तांनी दिले आहेत. मात्र त्यानंतरही मे महिना सुरू झाला तरी अवघी २७ टक्के नालेसफाई झाली आहे.
- यामुळे ३१ मे पर्यंत नालेसफाई १०० टक्के पूर्ण होणार का? याबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे.



# भोंग्यांसदर्भात ८४ अर्ज प्राप्त

### मुंबई पोलिसांची माहिती

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** राज्यात भोंग्यावरून राजकारण तापल्यानंतर राज्य सरकारने धार्मिक स्थळांवर भोंगे लावण्यासाठी पोलिसांची परवानगी आवश्यक असल्याचे सांगितले. त्यानंतर मुंबई पोलिसांना भोंगे लावणे आणि काढण्यासंदर्भात मागील आठवड्यात ८४ अर्ज प्राप्त झाले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुढीपाडव्याच्या सभेमध्ये मशिदीवरील भोंगे काढण्यासंदर्भात वक्तव्य केल्यानंतर राज्यातील राजकारण तापले होते. त्यानंतर राज्य सरकारने कोणत्याही धार्मिक स्थळावर भोंगे लावण्याकरिता मुंबई पोलिसांची परवानगी असणे आवश्यक आहे, तसेच भोंग्याच्या आवाजासंदर्भात काही मर्यादा देखील आखून देण्यात आल्या आहेत. जर एखाद्या धार्मिक स्थळावर पोलिसांकडून आखून देण्यात आलेल्या मर्यादा भंग करण्यात आल्या, तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई देखील करण्यात येणार असल्याचे म्हटले होते.

मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी गुढीपाडवा मेळाव्यात मशिदींवरील भोंग्यांबाबत भूमिका घेतली होती. राज ठाकरे यांनी राज्यातील सर्व मशिदींवरील भोंगे उतरवण्यासाठी ३ मे पर्यंतचा अल्टिमेटम दिला होता. ही मुदत संपण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक आहेत.

### ‘ध्वनी प्रदूषण नियम आखून दिले’

मुंबई पोलिसांना धार्मिक स्थळांवर भोंगे लावणे आणि काढण्यासंदर्भात ८४ अर्ज प्राप्त झाले आहे. त्यातील अनेक धार्मिक स्थळांना मुंबई पोलिसांकडून परवानगी देखील देण्यात आली आहे. तसेच ध्वनी प्रदूषण नियमसुद्धा आखून देण्यात आले आहे. त्यानुसार आम्ही सायलेंट आणि औद्योगिक झोनमध्ये परवानगी दिली आहे, असे मुंबई पोलीस आयुक्त संजय पांडे यांनी सांगितले. दरम्यान, रविवारी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुन्हा भोंगे उतरण्यासंदर्भात मनसैनिकांना आवाहन केले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता आहे. हे पाहता मुंबई पोलीस अधिकच सतर्क राहिले, असे चिन्हे आहेत.

### १५ लाखांपर्यंत मिळणार वर्क ऑर्डर

# नवउद्योजकांसाठी स्टार्टअप

### सहभागासाठी अर्ज करण्याचे राजेश टोपेंचे आवाहन

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत तरुण आणि नवउद्योजकांच्या कल्पनांना चालना देण्यासाठी महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये सहभागी होण्याकरिता अर्ज करण्यासाठी इच्छुक स्टार्टअप्सनी www.msins.in/startup-week या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन विभागाचे मंत्री राजेश टोपे यांनी केले आहे. अर्ज करण्याची मुदत ३० मे पर्यंत आहे.

स्टार्टअप्सना शासनासोबत काम करण्याची संधी देण्यासाठी महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताह हा एक प्रमुख उपक्रम आहे. स्टार्टअप्सची नाविन्यपूर्ण उत्पादने आणि सेवा यांचे प्रकल्प शासकीय यंत्रणेत राबवून प्रशासनात नाविन्यता आणणे हे या सप्ताहाचे मुख्य उद्दिष्ट आहे. याअंतर्गत प्राप्त अर्जांपैकी अव्वल १०० स्टार्टअप्सना त्यांच्या नाविन्यपूर्ण उत्पादने, सेवा यांचे सादरीकरण मंत्री, वरिष्ठ शासकीय अधिकारी, गुंतवणूकदार, तज्ज्ञ यांच्या समितीसमोर करण्याची संधी भेटते व त्यातील विजेत्या २४ स्टार्टअप्सना त्यांची नाविन्यपूर्ण उत्पादने, सेवा प्रायोगिक तत्त्वावर संबंधित शासकीय विभागांबरोबर राबविण्यासाठी नाविन्यता सोसायटीमार्फत १५ लाख रुपयांपर्यंतचे कार्यादेश (वर्क-ऑर्डर्स) दिले जातात.



> महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताह या उपक्रमाच्या आतापर्यंत चार आवृत्त्या आयोजित केल्या गेल्या असून विजेत्या स्टार्टअप्सनी राष्ट्रीय आरोग्य मिशन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महावितरण, ग्रामविकास विभाग, विविध महानगरपालिका, जिल्हा कार्यालये अशा विविध शासकीय संस्था, विभागांसोबत काम पूर्ण केले आहे.
>
> – **मनिषा वर्मा**, प्रधान सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता

### नाविन्यता सोसायटीमार्फत विविध उपक्रम

महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरणाची उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत राज्यातील सर्व घटकांकरिता स्टार्टअप व नाविन्यता क्षेत्राशी संबधित विविध योजना, उपक्रम व कार्यक्रम राबविले जातात. या धोरणांतर्गत स्टार्टअप सप्ताहाव्यतिरिक्त इनक्यूबेटर्सची स्थापना, स्टार्टअप व नाविन्यपूर्ण यात्रा, ग्रँड चॅलेंज, हॅकॅथॉन, गुणवत्ता परीक्षण आणि प्रमाणन अर्थसहाय्य योजना, बौद्धिक संपदा हक्क (पेटंट) अर्थसहाय्य योजना, महाराष्ट्र व्हर्चुअल इनक्युबेशन सेंटर आणि हिरकणी नवउद्योजक महाराष्ट्राची यांसारख्या अनेक उपक्रमांची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपक्रमांमुळे राज्यातील अनेक नवउद्योजकांना उद्योजकतेशी निगडीत विविध प्रकारचे सहाय्य व मार्गदर्शन उपलब्ध होत आहे, अशी माहिती नावीन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेन्द्र सिंह कुशवाह यांनी दिली.

# पोलिसांची सिटी फोरम समिती स्थापन करणार

### पोलीस आयुक्त संजय पांडे यांची माहिती

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** मुंबई पोलीस आयुक्त संजय पांडे यांनी शहरातील प्रत्येक भागात अॅडव्हान्स्ड लोकॅलिटी मॅनेजमेंट (एएलएम) आणि मोहल्ला कमिटीच्या सदस्यांचा समावेश असलेली सिटी फोर समितीची स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. फेसबुकवर रविवारी दुपारी संजय पांडे लाईव्ह होते. यावेळी जनता आणि पोलीस यांच्यातील दरी कमी करण्यासाठी एएलएम आणि मोहल्ला समितीच्या सदस्यांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याचे पांडे यांनी सांगितले. संजय पांडे म्हणाले की, मुंबई शहरात दक्षिण, मध्य, पश्चिम, पूर्व आणि उत्तर असे पाच झोन आहेत. प्रत्येक झोनमध्ये सक्रिय गटाचे तीन सदस्य होते. तसेच संपूर्ण शहरात १२ झोन आहेत आणि प्रत्येक झोनमध्ये ६० लोकांच्या टीममध्ये पाच सदस्य असतील. या सर्वांवर वरिष्ठ अधिकारी देखरेख करतील.

संजय पांडे म्हणाले की, समाजातील विविध समस्या मांडून त्यावर उपाय शोधण्यातही मदत होईल, प्रश्न मांडण्यासाठी एक चौकट हवीच.

# लोकलमध्ये चोरटे वाढले

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** तब्बल दोन वर्षांनंतर कोरोनाचे सर्व निर्बंध हटविण्यात आले आहे. परिणामी पुन्हा लोकलमध्ये गर्दी वाढू लागली आहे. याच गर्दीचा फायदा घेत चोरी करणाऱ्यांची संख्या देखील वाढलेली आहे. मोबाईल, मौल्यवान वस्तूची चोरी होण्याची प्रकरणे वाढली जात आहे. नुकताच एक प्रवासी बेसावधपणे प्रवास करत असताना साखळी चोरी करण्याची घटना घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी १०.३० च्या सुमारास पश्चिम रेल्वेच्या दादर फलाट ३ वर विरार-चर्चगेट लोकल आली असता, लोकलमध्ये बसलेल्या प्रवाशाच्या गळ्यातील सोनसाखळी जबरदस्तीने गळातून खेचून चोराने पळ काढला.



प्रवाशाने यासंदर्भात मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी चोराचा शोध घेण्यास सुरुवात केली. सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने चोराचा मागोवा घेण्यात आला. पोलिसांनी तांत्रिक पद्धतीने तपास करून पाच दिवसात चोराला अटक केली. या घटनेतून या चोराकडून २० ग्रॅम वजनाची सोनसाखळी तपासदरम्यान जप्त केली आहे. तर, आरोपीची चौकशी करण्यात येत आहे आहेत.

### पोलिसांची डोकेदुखी वाढली

मुंबई आणि उपनगरील वाढत्या लोकसंख्येमुळे रेल्वेचा उपनगरी रेल्वे प्रवास अत्यंत जिकरीचा झाला आहे. काही वर्षांत लोकलमधील प्रवाशांची संख्या वाढली आहे. त्यामुळे लोकलच्या डब्यातील प्रवास म्हणजे तारेवरची कसरत ठरत आहे. या गर्दीचा फायदा घेईन मोबाईल, मौल्यवान वस्तूची चोरी होण्याची प्रकरणे वाढली आहे. त्यामुळे पोलिसांची सुद्धा डोकेदुखीत वाढ झाली आहे. या चोरट्यांना आळा घालण्यासाठी रेल्वे स्थानकांवर पोलीस गस्त वाढविण्यात येत आहेत.

**मुंबई,** महाराष्ट्र दिन यंदा राज्यात उत्साहात साजरा केला गेला. कोरोनाचे सावट कमी झाल्यामुळे लावण्यात आलेले निर्बंध काढल्यामुळे यंदा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# बाळगोपाळांनी लुटला मेट्रो सफरीचा आनंद



**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** गणपत पाटील नगरमधील शालेय विद्यार्थ्यांनी शिवसेनेचे माजी नगरसेवक, मुंबै बँकेचे संचालक अभिषेक घोसाळकर यांच्यासोबत केक कापत विनोद घोसाळकर यांचा वाढदिवस साजरा केला. यावेळी विद्यार्थ्यांनी नवीन सुरू झालेल्या मेट्रोची सफर केली.

विद्यार्थी मोठ्या उत्साहाने यात सहभागी झाले होते. घोसाळकर यांनी सामाजिक बांधिलकी जपत आय.सी. कॉलनीतील कम्युनिटी सेंटर मधील यव्होन डिसूजा व आय.सी.महिला टीमच्या सौजन्याने शालेय विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण उपलब्ध करून दिले आहे. त्याठिकाणच्या विद्यार्थ्यांनी मेट्रोची सफर अनुभवली.

## पश्चिम रेल्वे जीएमपदी प्रकाश बुटानी

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** पश्चिम रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक प्रकाश बुटानी यांनी रेल्वे बोर्डाच्या निर्देशानुसार जीएमचा पदभार स्वीकारला आहे. आता ते पश्चिम रेल्वेचे प्रभारी जीएम म्हणून काम पाहतील. आतापर्यंत मध्य रेल्वेचे जीएम अनिलकुमार लाहोटी यांच्याकडे पश्चिम रेल्वेच्या जीएमपदाचा अतिरिक्त कार्यभार होता. प्रकाश बुटानी हे भारतीय रेल्वे सेवेचे मेकॅनिकल इंजिनीअरिंग १९८५ बॅचचे वरिष्ठ अधिकारी आहेत. यापूर्वी त्यांनी मध्य रेल्वे, दक्षिण पूर्व रेल्वे, उत्तर पश्चिम रेल्वे, डिझेल कंपोनंट वर्क्स, पटियाला आणि रेल्वे कोच फॅक्टरी कपूरथला येथे विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे.



# दिव्यांगांचा दहिसर ते आरे मेट्रो प्रवास

### स्नेहज्योत दिव्यांग सेवा प्रतिष्ठानचा उपक्रम



**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** शहरातील दिव्यांगांसाठी रविवार हा संस्मरणीय दिवस ठरला. ‘स्नेहज्योत दिव्यांग सेवा प्रतिष्ठान’ या संस्थेने दहिसर पूर्व स्थानक ते आरे असा मेट्रो प्रवास दिव्यांगांसाठी आयोजित केला होता. यावेळी दिव्यांगांच्या त्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमलले.

पहिल्यांदाच अनेक दिव्यांगांनी मेट्रोने प्रवास केला. अनेकांनी पुन्हा-पुन्हा प्रवास करण्याची इच्छा व्यक्त केली. पहिल्या प्रवासात ६० दिव्यांग होते आणि त्यांची देखभाल करण्यासाठी स्वयंसेवक होते. या मेट्रो टूरचे नियोजन करणारे आणि कोरोनाच्या काळात सेवा देणारे ‘भारत मर्चंट चेंबर’चे विश्वस्त राजीव सिंगल यांनी मेट्रो रेल्वेच्या अतिरिक्त आयुक्त सोनिया सेठी, एमएमआरडीए आयुक्त एसव्हीआर श्रीनिवास, दिव्यांग संस्था, दहिसर मेट्रो स्टेशनचे पदाधिकारी यांची भेट घेतली. सुरक्षा कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त करताना ते म्हणाले की, त्यांच्या सहकार्यामुळे दिव्यांगांना मेट्रोचा प्रवास करता आला,


## फैजपुर नगरपरिषद, फैजपुर

### जाहीर ई-निविदा सूचना २०२२-२३

जा.क्र./१३२/२०२२-२३ दिनांक ०२/०५/२०२२

फैजपुर नगरपरिषद फैजपुर जि. जळगांव यांच्याकडुन पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी पाणी पुरवठा विभागासाठी सन २०२२-२०२३ करीता पाणीपुरवठा यंत्रणेतील निरनिराळ्या व्यासाच्या व प्रकारच्या उद्धरण वाहिन्या व वितरण वाहिन्या यांची परिरक्षण दुरुस्ती व लिकेज दुरुस्ती मजुरीसह दुरुस्ती करणे करीता खोदाई, जोडाई व बुजाई व मजुरीचे वार्षीक निविदा सुचना प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी सदर कामी निविदा फार्म विक्री दिनांक ०२/०५/२०२२ ते स्वीकृती १६/०५/२०२२ पावेतो कार्यालयीन वेळेत राहील. सबब निविदा फार्म ची माहीती संबंधित विभागास भेट देऊन मिळेल. तरी इच्छुक निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
मुख्याधिकारी
फैजपुर नगरपरिषद फैजपुर

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - १८

### वृक्ष प्राधिकरण

### जाहीर नोटीस

महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन व अधिनियम 1975 चे कलम 8-3 अन्वये जाहिर नोटीस देणेत येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **माहे, मार्च, 2022 ते एप्रिल, 2022** या कालावधी मधील धोकादायक वृक्ष काढणे/वृक्षारोपण करणे या प्रकरणांना परवानगी देणेचा प्रस्ताव मा. वृक्ष प्राधिकरणा समोर आहे. याबाबत कोणाचे आक्षेप असल्यास त्या संदर्भात लेखी निवेदन अथवा तक्रार वृक्षाधिकारी, पिंपरी चिंचवड म.न.पा. कार्यालयाचा पत्ता - यशवंतराव चव्हाण गुलाब पुष्प उद्यान, टी ब्लॉक, हॉकी स्टेडीयमजवळ, नेहरूनगर, भोसरी पुणे-411026 यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासुन चार दिवसाचे आत समक्ष सादर करणेत यावेत.

सदर बाबत अधिक तपशिलवार माहिती वृक्षाधिकारी, पिंपरी चिंचवड मनपा याचे कार्यालयात कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरीकांना पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

सही/-
(सुभाष इंगळे)
उद्यान/वृक्षसंवर्धन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-18.

जाहिरात क्रमांक.-20
क्रमांक - वृक्ष/3अ/कावि/592/2022
दिनांक - 2/05/2022

## जाहीर नोटीसीस हरकत / जाणीव

तमाम लोकांस कळविण्यात येते की, दि.२२/०४/२०२२ रोजीच्या दै. प्रभात मधील अॅड. जनक द. लुंकड यांच्या जाहीर नोटिसीमध्ये वर्णन केलेल्या गांव **मौजे पुनावळे येथील स. नं. ४६/१६ मिळकतीमध्ये आमचे अशिल १. श्री. प्रमोद प्रतापसिंह शितोळे २. श्री. ज्ञानेश्वर किसन कुटे** यांचा हिस्सा आहे व त्याप्रमाणे त्यांचे नावाची नोंद ७/१२ सदरी फेरफार क्र. ३८७४ नुसार झालेली आहे व आज रोजी खरेदीखताप्रमाणे सदर मिळकत त्यांचे ताब्यात आहे.

मौजे पुनावळे **येथील स. नं. ४६/१६** मध्ये १. श्रीमती. गंगा हरिभाऊ बोरगे २. सौ. माया आबासाहेब वारघडे ३. सौ. माधुरी प्रविण पवार यांचा २५% हिस्सा होता व सदर २५% हिस्सा त्यांनी **१. श्री. प्रमोद प्रतापसिंह शितोळे २. श्री. ज्ञानेश्वर किसन कुटे** यांना दि.१७/०६/२०११ रोजीच्या दुय्यम निबंधक हवेली क्र. १७ यांचेकडे अनु. क्र. ६४८३/२०११ वरील खरेदीखताप्रमाणे विकलेला आहे. सदरच्या खरेदीखताप्रमाणे **१. श्री. प्रमोद प्रतापसिंह शितोळे २. श्री. ज्ञानेश्वर किसन कुटे** यांनी विकत घेतलेला ४.५० आर चा हिस्सा हा पुणे बंगलोर रोड याला लागून आहे व यांच्या ताब्यात आहे.

दि. २२/०४/२०२२ रोजीच्या दै. प्रभात मधील अॅड. जनक द. लुंकड यांनी मौजे पुनावळे येथील स. नं. ४६/१६ मधील मिळकतीसंदर्भात दिलेल्या जाहीर नोटिसी मधील मजकूर आमचे अशिलांना मान्य व कबूल नाही.

तरी तमाम लोकांस कळविण्यात येते की दि. २२/०४/२०२२ रोजीच्या दै. प्रभात मध्ये **अॅड. जनक द. लुंकड** यांनी सदर मिळकती संदर्भात दिलेल्या जाहीर नोटिसीस, सदरच्या जाहीर हरकतीने आमचे अशील हरकत घेत आहेत.

कोणाचीही कोणत्याही प्रकारची फसवणूक अथवा फसगत होऊ नये म्हणून सदरची जाहीर हरकत / जाणीव प्रसिद्ध केली असे.

दि. ०२/०५/२०२२

सही/-
**अॅड. महेश मा. भापकर**
रा. केशवनगर, चिंचवडगांव, पुणे - ४११०३३
मो. नं. ७३५०७३७४७५

## जाहीर नोटीस

अॅड. अमित दातार

### कल्याण येथील मोटार अपघात दावे न्यायाधीकरण यांचे समोर

**मोटार अपघात दावा क्र. १७/२०१८**

**श्री. संजय बाळकृष्ण पांडे** ...**अर्जदार**
**विरुध्द**
**श्री. सोमनाथ पी. खोडेकर व २** ...**सामनेवाले**
**प्रति,**
**श्री. देवराजकुमार बाळेश्वर प्रजापती,** सज्ञान, व्यवसाय वाहन चालक,
रा. ३८६, कांबळे वस्ती, ता. खेड, जिल्हा पुणे,

अर्जदारांनी सदरचा दावा तुमचे विरुध्द मोटार वाहन अधिनियमाचे कलम १६६ अन्वये नुकसान भरपाई मिळणेकरिता या न्यायाधिकरणाकडे दाखल केलेला आहे. अर्जदारास ज्ञात असलेल्या तुमच्या पत्यावर काढण्यात आलेली नोटिस ही तुम्ही उपरोक्त दिलेल्या पत्यावर मिळून आला नाहीत म्हणून न बजावता परत आलेली आहे. सबब तुमचे विरुध्दची नोटीस दैनिकात जाहीर नोटिशीद्वारे प्रसिध्द करुन तुमचेवर नोटीस बजावणी करण्याचा या न्यायाधिकरणाने आदेश केलेला आहे व त्याप्रमाणे तुमचे विरुध्दची नोटीस दैनिकात प्रसिध्द करण्यात येत आहे.

तरी या नोटिशीद्वारे तुम्हास सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाच्या पुढील तारीखेस म्हणजेच दि. ०९/०६/२०२२ रोजी, तुम्ही या न्यायाधिकरणासमक्ष स्वतः किंवा योग्य सुचना दिलेल्या वकिलांमार्फत हजर होऊन तुमचे म्हणणे लेखी स्वरुपात मांडावे. दि. ०९/०६/२०२२ रोजी तुम्ही गैरहजर राहिल्यास तुम्हास या प्रकरणी काहीही म्हणणे मांडावयाचे नाही असे गृहित धरुन सदर मोटार अपघात दाव्याची सुनावणी घेण्यात येऊन अंतिम निर्णय देण्यात येईल याची तुम्ही नोंद घ्यावी.
आज दि. २४/०४/२०२२ रोजी माझे सही तसेच कार्यालयाच्या मुद्रेनिशी दिले.

सही/- **लिपीक** (कोर्टाचा शिक्का) सही/- **अधिक्षक**
मोटार अपघात न्यायाधिकरण कल्याण

## ट्रायकॉम फ्रूट प्रॉडक्ट्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय : गट क्र. ३३६, ३३८-३४१, गाव अंदोरी तालुका खंडाळे, शिरवळ, पंढरपूर रोड, जि. सातारा - ४१५५२१.**
**सीआयएन :** L67120PN1995PLC139099

### सूचना

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की कंपनीच्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा बुधवार, दि. २५.०५.२०२२ रोजी स. ११.०० वाजता गट क्र. ३३६, ३३८-३४१, गाव अंदोरी तालुका खंडाळे, शिरवळ, पंढरपूर रोड, जि. सातारा - ४१५५२१, महाराष्ट्र येथे ईजीएम मागविणाऱ्या सूचनेत विहित केल्यानुसार विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे जी सभासदांना कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडील त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यांवर बुक पोस्टद्वारे पाठवण्यीं आली आहे तसेच

ज्यासभासदांचेई-मेलआयडीज्कंपनी/डिपॉझिटरीपार्टिसिपंट्सकडेउपलब्धअसतीलत्यांनाई-मेलद्वारे पाठवण्यत आले अहोत. ईजीएमची सूचना कंपनीची वेबसाइट http://www.tricomfruitproducts.com वर व सीडीएसएलची वेबसाइट http://www.evotingindia.com वरही उपलब्ध आहे.

कंपन्या कायदा, २०१३ च्या अनुच्छेद १०८ व त्याअंतर्गत स्थापित नियम तसेच सूची विनियमनांच्या विनियमन ४४ अंतर्गत सूचना देण्यात येत अहे की, कंपनी आपल्या सभासदांना ईजीएमच्या सूचनेत विहित सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात मत देण्याकरिता ई-मतदान सुविधा देऊ करीत आहे. कंपनीने सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडद्वारे (सीडीएसएल) पुरविण्यात आलेली ई-मतदान सेवा प्राप्त केलेली आहे. कंपन्या कायदा, २०१३ च्या तरतुदींअंतर्गत तपशील खालीलप्रमाणे आहे :

ए) ईजीएमच्या सूचनेत विहित केल्यानुसार सर्व विषयांवर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात विचारविनिमय करण्यात येईल.
बी) ई-मतदानाची सुरुवातीची तारीख व वेळ : रविवार, दि. २२.०५.२०२२ रोजी स. ९.०० वा.
सी) ई-मतदानाची अंतिम तारीख व वेळ : मंगळवार, दि. २४.०५.२०२२ रोजी सायं. ५.०० वा.
डी) निर्धारित अंतिम तारीख : बुधवार, दि. १८.०५.२०२२.
ई) एजीएमच्या सूचनेच्या पाठवणीपश्चात एखाद्या व्यक्तीने कंपनीचे शेअर्स प्राप्त केले असतील व कंपनीची सभासद बनत असल्यास व निर्धारित अंतिम तारीख अर्थात बुधवार, दि. १८.०५.२०२२. रोजीनुसार भागधारक असल्यास ते helpdesk.evoting@cdslindia.com वर विनंती पाठवून लॉग इन आयडी व पासवर्ड मिळवू शकतील. तथापि, ते सीडीएसएलकडे आधीच ई-मतदानाकरिता नोंदीत असल्यास, ते मत देण्यासाठी विद्यमान युजर आयडी व पासवर्ड वापरू शकतील.
एफ) सभासदांना कळविण्यात येते की,
१. मंगळवार, दि. २४.०५.२०२२ रोजी सायं. ५.०० पश्चात ई-मतदानास परवानगी नसेल.
२. ज्या सभासदांनी परोक्ष ई-मतदानाद्वारे मत दिलेले नसेल त्या उपस्थित सभासदांना ईजीएममध्ये त्यांचा मतदान हक्क बजावण्यासाठी सभेदरम्यान एजीएमच्या ठिकाणी मत देता येऊ शकेल.
३. ज्या सभासदांनी ईजीएमच्या आधी परोक्ष ई-मतदनद्वारे मत दिलेले असेल त्यांना ईजीएममध्ये उपस्थित राहता येऊ शकेल, परंतु त्यांना ईजीएममध्ये पुन्हा मत देता येणार नाही.
४. ज्या व्यक्तीचे नाव निर्धारित अंतिम तारखेस म्हणजेच दि. १८.०५.२०२२ रोजीनुसार सभासदांच्या रजिस्टरमध्ये किंवा डिपॉझिटरीज्द्वारे बनवण्यात आलेल्या लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नोंद असेल त्यांनाच केवळ परोक्ष ई-मतदान किंवा ईजीएममध्ये मतदानाची सुविधा असेल.
५. इलेक्ट्रॉनिक मतदानाची प्रक्रिया व निर्देश ईजीएमच्या सूचनेत विहित आहेत.
६. तक्रारीकरिता संपर्क : ई-मतदानासंदर्भातील कोणतीही तक्रार असल्यास सभासदांकरिताचे Freqauently Asked questions (FAQ) VgoM www.evotinging.comda help section अंतर्गत उपलब्ध evoting user manual वाचावे किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ई-मेल पाठवावा.

ई - मतदान प्रक्रिया नि:पक्ष व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी परीनिरीक्षक म्हणून संचालक मंडळाने मे. एच. व्ही. गोर अॅन्ड कं., कंपनी सचिव (एसीएस : ३८३७७, सीओपी : १४२६९) यांची नेमणूक केली आहे.

सभेस उपस्थित राहून मत देऊ शकणारी व्यक्ती त्याच्या ऐवजी उपस्थित राहून मत देण्यासाठी प्रतिनिधी नियुक्त करू शकतोव सदर प्रतिनिधी सभासद असण्याची आवश्यकता नाही. प्रतिनिधी नियुक्त करण्याचे दस्तावेज कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सभेच्या सुरुवातीच्या किमान ४८ तास अगोदरपर्यंत पोहोचावेत.

ट्रायकॉम फ्रूट प्रॉडक्ट्स लिमिटेडकरिता
सही/-
चंद्रकांत जोशी
(डीआयएन : ०८३९८२१३)

ठिकाण मुंबई
दिनांक : दि. ३०.०४.२०२२
वेबसाइट : **www.tricomfruitproducts.com**


### दिलासा — मागेल त्याला स्वच्छ पाणीपुरवठा मिळणार

# ‘पाणी धोरणा’साठी पालिका सज्ज

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** मुंबई महापालिकेने ‘सर्वांना पाणी’ देण्याच्या धोरणाची १ मे पासून अंमलबजावणी होणार होती. त्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते पालिका प्रशासनातर्फे एका विशेष समारंभाचे आयोजन करण्यात येणार होते. मात्र या धोरणाच्या अंमलबजावणी कार्यक्रमासाठी मुख्यमंत्र्यांच्या वेळेची प्रतीक्षा जलाभियंता विभागातील अधिकारी करीत आहेत. मुख्यमंत्र्यांची वेळ मिळाल्यास धोरणाची अंमलबजावणी होणार असल्याची माहिती पालिकेच्या सुत्रांनी दिली. ‘सर्वांना पाणी’ देण्याच्या धोरणाची महाराष्ट्र दिनी अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला होता. या धोरणाची अंमलबजावणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत जाहिर होणार आहे. मागेल त्याला स्वच्छ पाणी पुरवठा समान दराने केला जाणार आहे.



- झोपडपट्टी, ओसी नसलेल्या इमारतींनाही यापुढे समान पाणी दिले जाणार आहे. त्यामुळे स्वच्छ आणि पुरेसा पाण्याचा पुरवठा केला जाणार असल्याने झोपडपट्ट्या, ओसी नसलेल्या आदींना सरसकट पाणी दिले जाणार असल्याने पाण्यासाठीची वणवण आता थांबणार आहे. या धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री ठाकरे यांची वेळ घेण्यासाठी पालिका प्रशासनाने प्रयत्न सुरू असून त्यांची वेळ मिळाल्यास धोरणाची अंमलबजावणी होईल, अशी माहिती पालिकेच्या सुत्रांनी सांगितले.

### अवैध झोपड्यांनाही मिळणार पाणी

मुंबईत पाणी चोरी आणि दूषित पाण्याच्या तक्रारी मागील अनेक वर्षांपासून कायम राहिले आहे. तसेच ओसी नसलेल्या इमारतीना, अनधिकृत झोपड्यांनाही पाणी जास्त दराने मिळते. पाणी हा नागरिकांचा जन्मसिद्ध अधिकार असल्याने नवीन धोरणानुसार या नागरिकांना समान दराने पाणी पुरवठा केला जाणार आहे.

### काय आहे धोरण?

रहिवाशांनी मंडळ स्थापन करून त्यांच्यापैकी जल जोडणीच्या उचित देखभालीस आणि/ पाणी आकाराच्या नियमीत अधिदानास जबाबदार अशा कमीत कमी एका अधिकृत प्रतिनिधीस नामनिर्देशित केले तरच अशा जोडण्या देण्यात येतील. धोरणांतर्गत जलजोडणी घेताना समुहाच्या खर्चाने मल:निसारण व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

जलजोडण्यांसाठी आवश्यकता असल्यास खड्डा तसेच मलनि:सारण व्यवस्थेसाठी आपल्या विभागाच्या सहाय्यक पालिका आयुक्त यांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी पाणीपुरवठ्याचा दाब जलजोडणीच्या विस्तारास अनुमती देण्यास पुरेसा आहे, अशा ठिकाणी समुहातील प्रत्येक सभासद जोडणी विस्तारासाठी लेखी अर्ज करू शकेल.